क्रमांक : २५८८/ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १६ जानेवारी, २०१७

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत...**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७ रोजीपासून विधान भवन, मुंबई** येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **सोमवार, दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी** वितरित करण्यात येत आहे (प्रत सोबत जोडली आहे).

**मंगळवार, दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजीपासून कार्यालयीन वेळेत QIS या संगणक प्रणालीवर Online पध्दतीने** व **"ई-१" कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) तेरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे Offline पध्दतीने तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील. यामध्ये Online पध्दतीद्वारे स्वीकारण्यात येणाऱ्या सूचनांची नोंद प्रथम घेण्यात येईल.**

तसेच **Offline** पध्दतीने प्रश्न सूचना सादर करणाऱ्या मा.सदस्यांना वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींना या सचिवालयातील **"ई-१"** कक्षात तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करून देण्यात येतील. **प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात याव्यात.** तसेच प्रश्न सूचनेवर एकापेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील, तर स्वाक्षरीच्याखाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा जेणेकरून त्यांची स्वाक्षरी ओळखणे सुलभ होईल व सूचनेसाठी सदस्यांच्या नावांचा क्रम निश्चित करणे सोईस्कर होईल.

**तसेच संसदीय कार्य विभागाने पाच आठवड्याचा म्हणजेच दिनांक ६ मार्च, २०१७ ते दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एका आठवड्याचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात येत आहे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

आपला,

**( जयवंत राणे )**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

F:\BUDGET 2017\ROTATION ORDER\(3) Buletin Part 2.doc

**रोटा/एचबी-२०४७[७५०-१-२०१६]-१**

महाराष्ट्र विधानपरिषद

पत्रक भाग दोन

क्रमांक : १

**सोमवार, दिनांक १६ जानेवारी, २०१७/पौष २६, शके, १९३८**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील (माहे मार्च-एप्रिल, २०१७) तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन **(माहे मार्च-एप्रिल, २०१७)** कालावधीकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ ते ५)**

**स्वीकृत प्रश्नांचे बॅलट विधानसभेतील बॅलट पध्दतीप्रमाणे काढण्यात येईल.** पहिल्या आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोन द्वारे मा.सदस्यांना मागावून कळविण्यात येईल.

तसेच या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना व त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींना तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात याव्यात. प्रत्येक अधिवेशनासाठी छापण्यात आलेल्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात आल्या नसल्यास त्या सूचना रद्द करण्यात येतील.

विवरणपत्र

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | सोमवार, दिनांक २० मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक २७ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक ३ एप्रिल, २०१७<br>*सोमवार, दिनांक १० एप्रिल, २०१७ | शुक्रवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७<br>गुरूवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७<br>शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७ |

..२/-

| | | | |
|---|---|---|---|
| दोन | (१) आदिवासी विकास मंत्री<br>(२) उद्योग व खनिकर्म मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री<br>(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री | मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०१७<br>*मंगळवार, दिनांक ११ एप्रिल, २०१७ | शनिवार, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०१७<br>शनिवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण मंत्री<br>(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७<br>*बुधवार, दिनांक १२ एप्रिल, २०१७ | शनिवार, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०१७<br>शनिवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७<br>गुरूवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७<br>शनिवार, दिनांक ४ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७ |
| चार | (१) वित्त व नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री | गुरूवार, दिनांक ९ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक १६ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक २३ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक ३० मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७<br>* गुरूवार, दिनांक १३ एप्रिल, २०१७ | सोमवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७<br>सोमवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७<br>सोमवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१७<br>सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी,२०१७<br>सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७ |
| पाच | (१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(३) कृषी, फलोत्पादन मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७ | मंगळवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७<br>मंगळवार, दिनांक १४ फेब्रुवारी,२०१७<br>सोमवार, दिनांक २० फेब्रुवारी,२०१७<br>मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०१७<br>मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७ |

*** आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७ ते शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवडयाच्या प्रश्नसूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.**

डॉ.अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १६ जानेवारी, २०१७

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष

..३/-

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

**(१) श्री. देवेंद्र फडणवीस ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग
(२) नगरविकास विभाग
(३) गृह विभाग
(४) विधी व न्याय विभाग
(५) बंदरे विभाग
(६) माहिती व जनसंपर्क आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

**(२) श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील --- महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल आणि मदत व पुनर्वसन विषयक बाबी)
(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग

**(३) श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार --- वित्त व नियोजन, वने मंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग
(३) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)

**(४) श्री. विनोद श्रीधर तावडे --- शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(३) मराठी भाषा विभाग
(४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)
(५) अल्पसंख्याक विकास विभाग (अल्पसंख्याक विकास व वक्फ विषयक बाबी)

**(५) श्री. प्रकाश मंचूभाई महेता --- गृहनिर्माण मंत्री**

गृहनिर्माण विभाग

**(६) श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे--- ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री**

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास विषयक बाबी)
(२) महिला व बाल विकास विभाग

**(७) श्री. विष्णु रामा सवरा --- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

**(८) श्री. गिरीश भालचंद्र बापट--- अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**

(१) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

**(९) श्री. गिरीष दत्तात्रय महाजन---- वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग

..४/-

**(१०) श्री. दिवाकर नारायण रावते --- परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
(१) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
(२) जलसंपदा विभाग (खारभूमी विकास विषयक बाबी)

**(११) श्री. सुभाष राजाराम देसाई --- उद्योग, खनिकर्म मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग व खनिकर्म विषयक बाबी)

**(१२) श्री.पांडुरंग पुंडलिक फुंडकर --- कृषि, फलोत्पादन मंत्री**
कृषि आणि फलोत्पादन विभाग

**(१३) श्री. रामदास गंगाराम कदम --- पर्यावरण मंत्री**
पर्यावरण विभाग

**(१४) श्री. एकनाथ संभाजी शिंदे --- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

**(१५) श्री. चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे --- ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)
(२) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

**(१६) श्री. बबनराव दत्तात्राव लोणीकर --- पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

**(१७) डॉ. दीपक रामचंद्र सावंत --- सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री**
सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग

**(१८) श्री. राजकुमार सुदाम बडोले --- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**(१९) प्रा.राम शंकर शिंदे --- जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**
(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण विषयक बाबी)
(२) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)

**(२०) श्री.जयकुमार जितेंद्रसिंह रावल --- रोजगार हमी, पर्यटन मंत्री**
(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) पर्यटन विभाग

**(२१) श्री.सुभाष सुरेशचंद्र देशमुख --- सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**(२२) श्री.महादेव जगन्नाथ जानकर --- पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**
पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभाग

**(२३) श्री.संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर --- कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)
(२) महसूल व वन विभाग (भूकंप पुनर्वसन विषयक बाबी)
(३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
(४) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिकांचे कल्याण विषयक बाबी)

---------